महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

रविवार ◆१० ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०५० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## अंबरनाथ-चिखलोली न्यायालयाची वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल

### - मुंबई उच्च न्यायालय न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील ही न्यायालयाची वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी आज येथे केले.

चिखलोली-अंबरनाथ येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या तसेच नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते तर उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

न्यायमूर्ती श्री.कुलकर्णी पुढे म्हणाले की, वाढत्या लोकसंख्येमुळे अंबरनाथसारख्या ठिकाणी हे न्यायालय झाल्यामुळे न्यायदानाचे काम जलदगतीने होणार आहे. चिखलोली-अंबरनाथ येथील ही न्यायालयीन इमारत आधुनिक असून येथे विविध आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. याकरिता इमारतीच्या बांधकामात समाविष्ट असलेल्या सर्व यंत्रणांचे आभार. या आधुनिक इमारतीच्या माध्यमातून "न्याय आपल्या दारी" ही संकल्पना साकार होण्यास मदत होणार आहे. लोकांचा न्याय व्यवस्थेवर प्रचंड विश्वास आहे. लोक न्यायालयात आपल्या समस्या घेऊन येतात. न्यायालयात येणाऱ्या नागरिकांचे काम लवकरात लवकर मार्गी लागले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, अंबरनाथ सारख्या जागरूक व गतिमान शहरातील ही वास्तू न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब ठरेल अशी मला अपेक्षा





आहे. या उद्घाटनाच्या निमित्ताने आपण न्यायालयाकडे केवळ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नव्हे तर जनतेच्या विश्वासास पात्र ठरणारी एक सजीव संस्था म्हणून पाहू या.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज उद्घाटन झालेल्या या न्यायालयाची इमारत अतिशय सुंदर व प्रशस्त झाली आहे. अंबरनाथची ओळख असलेल्या पुरातन शिवमंदिराप्रमाणे हे न्यायमंदिर देखील एक ओळख होईल. या न्याय मंदिरात कायम सत्याचाच विजय होईल. राज्याला निष्पक्ष न्यायदानाची परंपरा आहे. आम्ही विविध उद्घाटने करतो मात्र न्यायालयाचे उद्घाटन करणे ही एक आनंदाची आणि समाधानाची बाब आहे.

ते पुढे म्हणाले की, आपले शासन लोकांना न्याय देणारे आहे. मागील अडीच वर्षात 32 न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. न्याय संस्था सुदृढ करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सामान्य नागरिकांना चांगल्या वातावरणात न्याय मिळेल. त्याचप्रमाणे न्यायव्यवस्थेच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचे काम शासन करेल जेणेकरून नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होईल.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे, न्यायमूर्ती अद्वैत सेठना, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे श्रीनिवास अग्रवाल, तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष ॲड.विठ्ठल कोंडे-देशमुख, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.गजानन चव्हाण, उल्हासनगर तालुका बार ॲडव्होकेट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संजय सोनवणे, आमदार बालाजी किणीकर, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, कार्यकारी अभियंता सत्यनारायण कांबळे, उल्हासनगरचे उपविभागीय अधिकारी प्रशांतकुमार मानकर, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता मानसिंग शिंदे, तहसिलदार अमित पुरी, उप अभियंता हेमंत वाघमारे, अंबरनाथ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड, शाखा अभियंता प्रशांत घुगे, जिल्ह्यातील वकील, विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, नागरीक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्येष्ठ विधीज्ञांचा सत्कार तसेच उल्हासनगर बार असोसिएशनच्या वतीने प्रकाशित स्मरणिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते संविधान उद्देशिका प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उल्हासनगर तालुका बार ॲडव्होकेट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड.संजय सोनवणे यांनी तर आभार प्रदर्शन दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखलोली-अंबरनाथ अर्चना जगताप यांनी आणि सूत्रसंचालन ॲड.वैशाली पाटील व ॲड.नरेंद्र सोनजी यांनी केले.

## ३५६ गाव-पाड्यांचा पाणीप्रश्न होणार तीव्र



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूरः भावली धरणाच्या आऊटलेटमधून वाय टॅपिंग करुन पाणी पुरवठा योजना बनवण्याची परवानगी जलसंपदा विभागाने दिली होती. मात्र तब्बल आठ वर्षानंतर भावली धरणाच्या आऊटलेटमधून वाय टॅपिंग करण्यास या विभागाने हरकत घेतल्याने 356 गाव-पाड्यांचा पाणीप्रश्न तीव्र होणार आहे. तसेच या योजनेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला असून शासनाच्या करोडो रुपयांचा चुराडा होण्याची भीती व्यक्त होत आहे.

पाणीटंचाई ही शहापूर तालुक्याची प्रमुख समस्या आहे. माळ पठार, कसारा विभाग, शिरोळ-अजनुप विभाग, वाशाळा विभाग, तलवाडा पठार, साकडबाव पठार, डोळखांब विभाग, टाकीपठार, खर्डी व बिरवाडी या भागातील 97 गावे आणि 259 पाड्यांना फेब्रुवारी मार्च महिन्यांत मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईच्या झळा सोसाव्या लागतात. या पाणी टंचाईचे मूळ कारण असे की पाण्याची धरणे खाली व गाव-पाडे उंच पठारावर असल्याने लिफ्ट पाणी योजना यशस्वी होत नाही. या भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून गुरुत्वाकर्षण पद्धतीने भावली योजनेला मंजुरी मिळाली. या योजनेला अनेक अडथळे आले मात्र ते पार करून या योजनेच्या कामाला गती येत असल्याचे दिसत होते.

### मॅरेथॉन ठाण्याची..... ऊर्जा तरुणाईची

## आज धावणार ठाणेकर

### ठाणे महापालिका वर्षा मॅरेथॉन २०२५ साठी सज्ज

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द् असलेली 31 वी ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन रविवार 10 ऑगस्ट 2025 रोजी होणार आहे. यंदाही स्पर्धेत टाईम टेक्नॉलॉजीचा वापर 21 किमी पुरूष व महिला तसेच 18 वर्षावरील 10 किमीच्या स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. सदरची स्पर्धा 'मॅरेथॉन ठाण्याची.. उर्जा तरुणाईची' या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धावपटूंसह सहभागी होणार आहे. या मॅरेथॉन स्पर्धेची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून मोठ्या उत्साहात ही स्पर्धा पार पडणार असून स्पर्धकांना प्रोत्साहित करण्यासाठी ठाणेकरांनी मॅरेथॉनच्या मार्गावर मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

विविध 12 गटांत ही स्पर्धा होणार असून ऑनलाईन नोंदणी केलेल्या स्पर्धकांची वैद्यकीय चाचणी देखील पूर्ण झाली आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतील स्पर्धकांना टायमिंग चीपचे देखील वाटप करण्यात आले आहे. यंदाची ठाणे महानगरपालिका ही 6 वर्षांनी होत आहे, स्पर्धेच्या दिवशी वातावरणनिर्मिती व स्पर्धा सुरू होण्यापूर्वी स्पर्धेकरितेच्या सरावासाठी झुंबा वर्कआऊटचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका मुख्यालयासमोर उभारण्यात येणाऱ्या स्टेजसमोर झुंबा वर्कआऊट होणार आहे.

विजेत्यांना एकूण 10 लाख 38 हजार 900 रुपयांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांमध्ये वाढ करण्यात आली असून 21 कि.मी स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम 1 लाखांचे रोख पारितोषिक, सन्माचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच सर्वच बक्षीसांमध्ये वाढ करण्यात आली आहे.

महापालिका अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यासाठी 1 कि.मी ची 'कॉर्पोरेट रन' ठेवण्यात आली असून या स्पर्धेत महापालिका अधिकारी कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत ठाणे महापालिका शाळांमधील विद्यार्थी सहभागी होणार असून या विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी परिवहनच्या बसेसची सोय उपलब्ध करण्यात आली आहे.

स्पर्धकांना सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी वेळेत पोहचता यावे यासाठी रविवार दि. 10/08/2025 रोजी सकाळी 5.00 वा. बदलापूर ते ठाणे व दुपारी 1.00 वा. ठाणे ते बदलापूर अशी "विशेष लोकल सेवा" उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

21 कि.मी गटातील पुरूष व महिला ही स्पर्धा महापालिका भवन येथून सुरू होवून महापालिका भवन येथे समाप्त होणार आहे. 10 कि.मी 18 वर्षावरील खुल्या गटातील स्पर्धा खारीगांव ते कोपरी मार्गे महापालिका भवन अशी असणार आहे. 10 कि.मी 18 वर्षाखालील मुलांसाठी असलेली स्पर्धा महापालिका भवन येथून सुरू होणार असून मिलेनियम टोयाटा येथे समाप्त होणार आहे. 10 कि.मी 15 वर्षावरील मुलींसाठी (खुला गट) असलेली स्पर्धा महापालिका भवन येथून सुरू होणार असून हिरानंदानी इस्टेट येथे समाप्त होणार आहे. 15 वर्षाखालील मुले व मुली दोन गटासाठी - 5 किमी अंतराची स्पर्धा महापालिका भवन येथून सुरू होणार असून ही स्पर्धा माँसाहेब मीनाताई ठाकरे चौक येथे समाप्त होणार आहे. 12 वर्षाखालील मुले व मुली दोन गटासाठी - 3 कि.मी अंतराची स्पर्धा महापालिका भवन येथून सुरू होवून मिलेनियम टोयाटा येथे समाप्त होणार आहे.

## जीवनदीप महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय खर्डी येथे आज विश्व जागतिक आदिवासी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रम हा संस्थेचे अध्यक्ष मा.श्री रवींद्रजी घोडविंदे सर यांच्या संकल्पनेतून तसेच महिविद्यालयाचे प्राचार्य श्री. कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. सर्वप्रथम जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे



पर्यवेक्षक प्रा.श्री दीपक विशे सर यांनी आदिवासी लोककला लोकनृत्य या संपूर्ण आदिवासी बांधवांचा इतिहास सांगितला. तसेच आदिवासी बांधव यांचे राहणीमान व त्यांचे आवड निवड यांचे थोडक्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर बारावी आर्ट्सच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी तारपा नृत्य सादर केला. तसेच बारावी कॉमर्स या विद्यार्थ्यांनी त्यांच्या नृत्यातून आदिवासी बांधवांचे राहणीमान व पोशाख परिधान करून विद्यार्थ्यांना आदिवासी बांधवांची नव्याने ओळख पटवून दिली. यानंतर बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा आदिवासी नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बारावी सायन्स च्या विद्यार्थिनी कु. वैष्णवी गोसावी व दीपिका त्रिपाठी या विद्यार्थिनींनी केले. अश्याप्रकारे या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकोत्तर कर्मचारी सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते व कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

ठाणे महानगरपालिका
THANE Smart City Ltd.




ठाणे महानगरपालिकेच्यावतीने महाराष्ट्र राज्य व ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स संघटना मान्यता प्राप्त
३१ वी ठाणे महानगरपालिका 'वर्षा मॅरेथॉन २०२५' दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

उदघाटन व पुरस्कार वितरण समारंभ
मा. ना. श्री. एकनाथ संभाजी शिंदे
उपमुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)
तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा, यांच्या शुभहस्ते

प्रमुख अतिथी
मा. ना. श्री. गणेश नाईक — मंत्री, वने, महाराष्ट्र राज्य
मा. ना. श्री. प्रताप सरनाईक — मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य

सन्माननीय उपस्थिती
मा. डॉ. श्री. श्रीकांत शिंदे — खासदार, लोकसभा
मा. श्री. नरेश म्हस्के — खासदार, लोकसभा

या समारंभासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.
मा. डॉ. श्री. जितेंद्र आव्हाड — आमदार, विधानसभा
मा. श्री. संजय केळकर — आमदार, विधानसभा
मा. श्री. राजेश मोरे — आमदार, विधानसभा
मा. ॲड . श्री. निरंजन डावखरे — आमदार, विधानपरिषद

आपले विनीत
सौरभ राव (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
संदीप माळवी — अतिरिक्त आयुक्त (१)
प्रशांत रोडे — अतिरिक्त आयुक्त (२)

उदघाटन समारंभ : सकाळी ६.००
पारितोषिक वितरण समारंभ : सकाळी १०.३०
स्थळ : महापालिका भवन, पांचपाखाडी, ठाणे, (प)

मॅरेथॉन ठाण्याची... उर्जा तरुणाईची

## गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ १८-३९ ॥

जे सुख भोगकाळी आणि परिणामीही आत्म्याला मोह पाडणारे असते, ते झोप, आळस व प्रमाद यांपासून उत्पन्न झालेले सुख तामस म्हटले आहे. ॥ १८-३९ ॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु व पुनः । सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ १८-४० ॥

पृथ्वीवर, आकाशात किंवा देवांत तसेच यांच्याशिवाय इतरत्र कोठेही असा कोणताच प्राणी किंवा पदार्थ नाही की, जो प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांनी रहित असेल. ॥ १८-४० ॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप । कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ १८-४१ ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना अर्जुना), ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची कर्मे स्वभावतः उत्पन्न झालेल्या गुणांमुळे निरनिराळी केली गेली आहेत. ॥ १८-४१ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ १८-४२ ॥

अंतःकरणाचा निग्रह, इंद्रियांवर ताबा ठेवणे, धर्मासाठी कष्ट सहन करणे, अंतर्बाह्य शुद्ध राहणे, दुसऱ्यांच्या अपराधांना क्षमा करणे, मन, इंद्रिये व शरीर सरळ राखणे, वेद, शास्त्र, ईश्वर व परलोक इत्यादींवर विश्वास ठेवणे, वेदशास्त्रांचे अध्ययन-अध्यापन करणे आणि परमात्मतत्त्वाचा अनुभव घेणे, ही सर्वच्या सर्व ब्राह्मणाची स्वाभाविक कर्मे आहेत. ॥ १८-४२ ॥

# वढाव गावातील राधाकृष्ण उत्सवास सुरूवात

## ग्रामस्थांसह भाविकांची मांदियाळी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण शहरापासून अवघ्या आठ कि.मी. अंतरावर असणा-वढाव गावात ९ ऑगस्ट पासून राधाकृष्ण उत्सवास प्रारंभ झाला असून या उत्सवासाठी मुंबई,ठाणे, पुणे, कोकणासह महाराष्ट्राच्या कानाकोप-यातुन भाविक मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे.

या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे रोज रात्री भगवान गोपाळ कृष्णाला होणाऱ्या प्रदक्षिणा व रात्री कीर्तन, चाकरमान्यानी आतापासूनचहजेरी लावण्यास सुरुवात केली आहे .नारळी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी वढाव गावातील राधाकृष्ण उत्सवास सुरूवात होते. नित्यनियमाने मंदिरात सकाळी काकड आरती, प्रवचन ,हरीपाठ आणि विविध धार्मिक कार्यक्रम सतत आठ दिवस चालू असतात. दररोज रात्री गोपाळ कृष्णाला 5 प्रदक्षिणा घालतात त्या प्रदक्षिणा पाहाण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. यावेळी जयराम, श्रीराम जयराम या नावाच्या जल्लोषाने येथील परीसर दुमदुमून जाते. या उत्सवास सतत आठ दिवस कीर्तन होत असून सप्ताहा शमध्ये कृष्ण जयंतीच्या दिवशी सकाळ पासून वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम सतत सुरु असतात व रात्री कृष्ण जन्म सोहळ्याचे कीर्तन होते. कृष्णजन्म सोहळ्याचा महीमा पाहण्यासाठी खारेपाट भागातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात. कृष्ण जन्माच्या दिवशी वढाव व शेजारील गावांमधील ग्रामस्थांना व बालगोपाळांचा उपवास असतो.गावाच्या मध्यभागी असणा-या राधाकृष्ण मंदिरातून गोपाळकाला (गोविंदा) च्या दिवशी दुपारी देवाचा छबिना निघतो . या छबिना सोबत बालगोपाळ गुलाल उधळत ढोल वाद्यासह भक्तगण तसेच पारंपारिक गीत गाणारे पुरुष गीत गात श्रीचा छबीना दत्तगुरू मंडळ ,अंजनी कुमार मंडळ नंतर वढाव एसटी बस स्टैंड वरून राधाकृष्ण मंडळ येथील दहीहंड्या फोडून गोपाळ काला साजरा करतात. गोपाळकाला झाल्या नंतर दुसऱ्या दिवशी जेवणाचा कार्यक्रम होतो. सकाळी पादुकापुजन व कीर्तन झाल्या नंतर उत्सवाची सांगता होते. मंदिरात सकाळी काकड आरती प्रवचन,हरीपाठ,आणि विविध धार्मिक कार्यक्रम सतत आठ दिवस चालू असतात. चाकरमानी गावाकडे येण्यास सुरुवात झाली असून प्रत्येक जण आपआपल्या घरांची साफ सफाई करण्यात मग्न झाले आहेत. यामुळे वढाव भागातील परीसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे.



# ऑगस्ट क्रांती दिन

दुसऱ्या महायुद्धात भारताचा पाठींबा घेऊन,भारतीय जवानांचं बलिदान आपल्या स्वार्थासाठी करून घेणाऱ्या ब्रिटीश सरकारला आता काहीही केल्या देशातून हद्दपार करायचं असा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली घेतला. ०९ ऑगस्ट १९४२ साली मुंबईच्या गवालिया टैंक या मैदानातून झाली होती. त्यामुळेच हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन या नावाने साजरा केला जातो. त्यावेळचं गवालिया टँक मैदान आज ऑगस्ट क्रांती च्या नावाने आळखलं जातं.

संपूर्ण स्वराज्य या भावनेने प्रेरित होऊन इंग्रजांना भारतातून हुसकावून लावायचं असं ठरल्यानंतर महात्मा गांधीनी करेंगे या मरेंगे आणि चले जाव या दोन क्रांतीकारी घोषणा दिल्या. पुढे याच घोषणेनं सारा भारत ढवळून निघाला आणि देशभरात इंग्रजांविरोधात असंतोष वाढत गेला. देशभरात इंग्रजांविरोधात आंदोलनं होऊ लागली. मात्र ही आंदोलनं शांततापूर्ण मार्गाने असावी असं गांधीजींचं म्हणणं होतं. अशात काही आंदोलनांना हिसक वळणं लागली.

हे असं काही घडणार आहे याची कुणकुण इंग्रजांना लागली आणि ०९ ऑगस्ट १९४२ चं आंदोलन होऊ नये किंवा त्याची सुरूवात होऊ नये यासाठी इंग्रजांनी महात्मा गांधींसह जवळपास सर्वच बड्या नेत्यांना ताब्यात घेतलं होतं. गांधीजींना पुण्याच्या आगाखान पॅलेस इथं ठेवण्यात आलं होतं आणि इतर बड्या नेत्यांना नगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आलं होतं.

बडे नेतेच नसल्याने नऊ ऑगस्टचा प्लान फसणार अशा भ्रमात इंग्रज होते. मात्र त्याच वेळेस मुंबईच्या गवालिया टँक इथं तरूण तडफदार नेत्या अरूणा असफ अली यांनी तिरंगा फडकावत भारत छोडोचा नारा दिला आणि त्याचं लोण मग देशभर पसरलं. इंग्रजांच्या भ्रमाचा भोपळा ०९ ऑगस्ट १९४२ साली फुटला आणि हे आंदोलन इंग्रजांना आवरता आलं नाही. त्याआधी या आंदोलनाची आखणी ०४ ऑगस्ट १९४२ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने घेतला. आठ ऑगस्ट रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनात या प्रस्तावाला संमत करण्यात आलं. शेकडो हुतात्म्यांनी आपल्या बलिदानाने मातृभूमीची सेवा केली आणि त्याचं हे बलिदान व्यर्थ गेलं नाही. या आंदोलनासमोर इंग्रजांना हात टेकावे लागले आणि त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.

चार वर्ष चाललेल्या या आंदोलनात अनेक देह चंदनासारखे झिजले आणि १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला त्याच हुतात्मांनी स्वातंत्र्याचा टिळा लावला.

# छत्रपती शिवरायांच्या मंदिराला भेट देण्याचे नितीन गडकरी यांना निमंत्रण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील मराडेपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिरास भेट देण्याचे निमंत्रण केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना दिल्ली येथील भेटीत शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजुभाऊ चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी यांनी दिले आहे.

भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांच्या माध्यमातून दिल्ली निवासस्थानी नितीन गडकरी यांची मंदिराच्या विश्वस्थांनी सदिच्छा भेट घेतली.यावेळी संस्थेचे राजूभाऊ चौधरी,विश्वस्त पदाधिकारी कैलास महाराज निचिते,संभाजी रविकांत पाटील उपस्थित होते.या वेळी शिवक्रांती प्रतिष्ठानच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन गडकरी यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी चौधरी यांनी संस्थेच्या मंदिरासह भविष्यातील उपक्रमांची माहिती दिली.मंत्री गडकरी यांनी संस्थेच्या शिवकार्याचे कौतुक करून, महाराष्ट्रात श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे शक्तिपीठ निर्माण करून आपण महाराष्ट्राचा गौरव वाढवला आहे अशी प्रतिक्रिया देऊन शिवक्रांती प्रतिष्ठानच्या सर्व सहकाऱ्यांना शुभेच्छा देत श्री छत्रपती शिवाजी महाराज मंदिर येथे लवकरच भेट देण्याचे आश्वासन दिले आहे.

# ऑगस्ट क्रांती दिनी केडीएमसीचे हुतात्मा स्मारकास अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणांचे बलिदान दिले, त्यांना स्मरण करण्याचा दिवस, तमाम क्रांतीवीरांना अभिवादन करण्याचा दिवस म्हणजे 9 ऑगस्ट म्हणजेच " ऑगस्ट क्रांती दिन"

आज "ऑगस्ट क्रांती दिन" निमित्त महापालिकेतर्फे महापालिकेच्या मुख्यालयाच्या प्रांगणात असलेल्या हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या वेळी सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार यांनी उपस्थितांना ऑगस्ट क्रांती दिनाची माहिती विषद केली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात असलेल्या हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. या वेळी उपस्थित महापालिका सचिव किशोर शेळके, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता अशोक घोडे, लेखा अधिकारी राजू दराडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे तसेच महापालिकेचे इतर अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते. यासमयी महापालिकेचे सुरक्षा रक्षक व एम. एस. एफ चे जवान यांनी हुतात्मा स्मारकास सलामी दिली.

# भिवंडीत मार्कंडेय महामुनी प्रतिमेची रथयात्रा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात राखी पौर्णिमा हा सण मोठ्या उत्साहात संपन्न झाला असतानाच पदमशाली समाज बांधवाच्यावतीने रक्षाबंधन सण एका अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला यानिमित्ताने समाज बांधवाचेवतीने आराध्य दैवत मार्कंडेय महामुनी यांची वाजतगाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी पारंपारिक हातमागावर वस्त्र विणुन ते देवाला अर्पण करुन हा सण साजरा करण्यात आला.हजारो भाविक या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

पदमशाली समाजाचे आराध्य दैवत मार्कंडेय महामुनी यांनी ब्रम्हदेव यांना वस्त्र विणुन दिले असल्याची अख्यायिका सांगितली जाते.त्या निमित्त आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यातील विणकर समाज असलेल्या पदमशाली समाज श्रावणी पोर्णिमा अर्थातच रक्षाबंधन सणा निमित्ताने भिवंडीत पद्मशाली समाजाच्या वतीने भगवान मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेची वाजत गाजत भव्य रथयात्रा काढण्यात आली होती. या निमित्ताने हातमागावर तयार करण्यात आलेले वस्त्र भगवान मार्कंडेय महामुनी यांना अर्पण करण्यात आले. या रथयात्रेत शेकडो समाजबांधव सहभागी झाले होते.



**हजारो भाविक सहभागी**

कापड उद्योगाची नगरी म्हणुन ओळखल्या जाणा-या भिवंडी शहरात मोठ्या संख्येने आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्यातील पदमशाली समाज राहत आहेत.पावरलुम उद्योगासह इतर व्यवसाय करीत धार्मिक कार्यक्रम ते मोठ्या उत्साहात संपन्न करत असतात. पद्मानगर, कामतघर, कोंबडपाडा,भंडारी कंपाऊंड,नारपोली अशा विविध परिसरात राहणारे समाजबांधव राखी पौर्णिमेचा सण ही मोठ्या उत्साहात साजरा करत असतात या निमित्ताने आज सायंकाळी पदमशाली समाजा बांधवांनी दैवत मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेची वाजतगाजत भव्य रथयात्रा काढली होती, पद्मशाली समाजाचे नेते कृष्णा गाजेंगी, आमदार महेश चौघुले,रामकृष्ण पोटाबत्तीनी, माजी गरसेवक, सुमित पाटील, नारायण चौधरी, अँड.हर्षल पाटील, भाजप शहर अध्यक्ष रवींद्र सावंत, राजू गाजेंगी, माजी नगरसेवक निलेश चौधरी, साईनाथ पवार, राजेंद्र वासम, यांच्या सह मान्यवर या रथयात्रेत सहभागी झाले होते.

अखिल पदमशाली समाज भिवंडी संस्थेच्यावतीने सायंकाळी पदमानगर येथील बालाजी मंदीर येथुन सुरु झालेली रथयात्रा धामणकर नाका, गौरीपाडा रोड, प्रभुआळी मंडई मार्गे कासारआळी येथील मार्कंडेश्वर मंदीरा जवळ धार्मिक कार्यक्रम करून समारोप करण्यात आला.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त कल्याणात भव्य रॅली

## संयुक्त आदिवासी उत्सव समिती कल्याणचे आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आदिवासी संस्कृती आणि त्यांच्या अस्तित्वाची ओळख जगाला व्हावी आणि एकजुटीचे प्रदर्शन व्हावे यासाठी ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिवसाचे औचित्त साधून कल्याण मध्ये भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीत आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारे पेहराव परिधान करून नागरिक सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या रॅलीत सुशिक्षित तरुणाईचा मोठ्या प्रमणात सहभाग असल्याचे दिसून आले.

जागतिक आदिवासी दिवसानिमित्त कल्याणात भव्य रॅलीत काढण्यात आली. आदिवासी क्रांतीकारांना आदरांजली वाहून रॅलीची सुरवात पश्चिमेतील सुभाष मैदान येथून होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक, पत्रीपूल, चक्की नाका, विजयनगर येथे समारोप झाला. रॅलीमध्ये आदिवासींची संस्कृती, आदिवासी नृत्य, आदिवासी गीते, पोवाडे, विविध वाद्य, वेशभूषा, पारंपारिक लोकनृत्याच्या माध्यमातून आदिवासी कलागुण पाहायला मिळाले. तसेच आदिवासी क्रांतिकारकांचे देखावे सादर करण्यात आले.

या रॅलीत संयुक्त आदिवासी उत्सव समिती कल्याणचे अध्यक्ष प्रभुदास पंधरे, रामनाथ भोजने, भागजी भांगरे, भरत बुळे, भरतकुमार पाटील, सविता हिले, जयराम शिंदे, संजय ओंकारेश्वर, दिलीप वरकडे आदींसह कल्याण डोंबिवली महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी वृंद यांच्यासह हजारोंच्या संख्येने सर्व आदिवासी बांधव सहभागी झाले.

# कल्याण स्टेशन परिसरात मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय

## कल्याण महात्मा फुले पोलीसांनी केला पर्दाफाश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण रेल्वे स्टेशन या गजबजलेल्या परिसरात एका स्पा मसाज पार्लरमध्ये मसाज च्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याचा पर्दाफाश कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी केला आहे. अवंतरा स्पा नावाच्या या मसाज पार्लरवर महात्मा फुले पोलिसांच्या पथकाने छापा टाकत मॅनेजर नौशाद शेख, चालक योगेश चव्हाण, आणि भीमसिंग नाईक, या तिघांना बेडा ठोकल्या आहेत. तर या स्पा पार्लरमधून 10 पीडित महिलांची सुटका केली आहे.


### चालकासह मॅनेजरला बेड्या १० महिलांची केली सुटका

कल्याण रेल्वे स्टेशन वल्लीपीर रोड या गजबजलेल्या परिसरात अवंतरा स्पा नावाने मसाज पार्लर थाटण्यात आले होते. या मसाज पार्लरमध्ये मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरू असल्याची माहिती महात्मा फुले पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अवंतरा मसाज पार्लरमध्ये छापा टाकला. यादरम्यान या मसाज पार्लरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची दिसून आले. महात्मा फुले पोलिसांनी तत्काळ या मसाज पार्लरचा मॅनेजर नौशाद शेख, चालक योगेश चव्हाण आणि भीमसेन नाईक या तिघांना अटक केली.

तर या मसाज पार्लरमध्ये महिलांना कामावर ठेवून पैशांचे आमिष दाखवत महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी या मसाज पार्लरमधील 10 पीडित महिलांची सुटका केली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली.

## रेसिपी

### राजस्थानची फेमस मिठाई घेवर



साहित्य

मैदा - 1 1/2 कप
तूप - 2 चमचे
दूध - 1 चमचा
बर्फाचे तुकडे - 2
साखर - 1 1/2 कप
तेल किंवा तूप
वेलची पूड - 1/4 चमचा
ड्रायफ्रुट्स -

कृती

सर्वप्रथम एका भांड्यात मैदा, दूध, तूप आणि बर्फाचे तुकडे घालून घोटून घ्यावे.आता त्यात हळूहळू थंड पाणी घालून गुठळी विरहित बॅटर तयार करून घ्यावे.एका पातेल्यात साखर, पाणी एकत्र करुन पाक तयार करुन घ्यावे.एकतरी पाक तयार करून घ्यावा. त्यात वेलची पूड आणि केशर घालावी.दुसरीकडे एका खोलगट भांड्यात तूप गरम करा.एका मोठ्या चमच्याने बॅटर गरम तेलात मधोमध टाका. बॅटरला बुडबुडे येतील आणि घेवर तयार होईल.कुरकुरीत होईपर्यंत मध्यम आचेवर तळून घ्या.तळल्यानंतर घेवर टिश्यू पेपरवर ठेवा, जेणेकरून त्यातील तेल निघेल.आता गरम पाक घेवरवर ओता.वरून ड्रायफ्रुट्स घाला.अशा पद्धतीने तयार झाले आहे, राजस्थानची प्रसिद्ध मिठाई घेवर, तेही घरीच.

## आजचे राशि भविष्य

**मेष**
तुमच्याकडे दिवसभर भरपूर ऊर्जा असेल आणि तुम्ही प्रतिकूल परिस्थितीतही समस्या सोडवू शकाल. आज उत्पन्नाच्या स्त्रोतांमध्ये वाढ होईल.

**वृषभ**
आपले ध्येय साध्य करण्यासाठी लक्ष केंद्रित करू शकता. वडिलोपार्जित मालमत्तेशी संबंधित काही प्रलंबित प्रकरण सोडवण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन**
दिवस चांगला आहे. काही खास लोकांकडूनही तुम्हाला सहकार्य मिळेल. थोडी काळजी आणि आत्मविश्वासाने, बहुतेक कामे सुरळीतपणे पूर्ण होतील.

**कर्क**
आज तुम्ही सामाजिक कार्यात नक्कीच हातभार लावाल, यामुळे तुमचे संपर्क वर्तुळ वाढेल. आणि त्याच वेळी, ध्येयाकडे पूर्णपणे लक्ष केंद्रित कराल.

**सिंह**
धार्मिक कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आमंत्रणही मिळेल. जमीन किंवा मालमत्तेशी संबंधित प्रकर सोडवले जाऊ शकते.

**कन्या**
जर कुठेतरी उधार दिले असेल किंवा अडकले असेल तर ते परत मिळण्याची शक्यता आहे.नात्यातील खराब संबंध सुधारण्यात तुमची भूमिका असेल.

**तूळ**
घरातील काही कामात व्यस्त राहिल्याने तुम्हाला थकवा येईल, परंतु तुमच्या मेहनतीचे अपेक्षित परिणाम मिळाल्याने तुम्हाला आराम मिळेल.

**वृश्चिक**
आर्थिक बाबतीत आजचा दिवस फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज काही अडथळे येतील, पण मित्र आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने समस्या सुटतील.

**धनु**
एखाद्या गोष्टीबाबत तुमच्या मनात काही नकारात्मक विचार येत असतील तर तुम्ही त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न कराल .यशस्वीही व्हाल.

**मकर**
यशस्वीही व्हाल.व्यवसायातील जबाबदारी पार पाडण्यासाठी खूप मेहनत करावी लागेल.मालमत्तेशी संबंधित कोणतीही समस्या सुरू असेल .

**कुंभ**
तुम्हाला एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळेल, परस्पर संवादातून आनंदही मिळेल. नाती जपतील.काही काम पूर्ण होतील.

**मीन**
नवीन कामाशी संबंधित कोणतीही योजना बनवण्यापूर्वी त्याची संपूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे.खर्चात सुसूत्रता आणल्यास आर्थिक स्थितीत स्थैर्य येईल.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# गणेशोत्सवानिमित्त एसटी महामंडळाच्या विशेष नियोजनाला वेग



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गणेशोत्सव सण अवघ्या दोन आठवड्यांवर येऊन ठेपला आहे. या सणानिमित्त कोकणात जाणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. हे पाहता रेल्वेसह एसटी प्रशासनाने जादा गाड्या सोडल्या आहेत. एसटी महामंडळाने घोषित केलेल्या जादा गाड्यांपैकी जवळपास निम्म्या गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. मात्र कोकणात जाणाऱ्या गाड्या मुंबईत प्रत्येक थांबा घेत नसून थांबा द्यावा, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात होती. दरम्यान एसटी महामंडळाने स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी तात्पुरते बस थांबे निश्चित केले आहेत. तसेच बसथांब्यावरून कोकणात जादा गाड्या मार्गस्थ करण्यात येणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, महामुंबईतून कोकणासाठी २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान पाच हजार जादा गाड्या सोडण्याची घोषणा एसटी महामंडळाने केली आहे. यामध्ये महिला, ज्येष्ठ नागरिकांना विशेष गाड्यांमध्ये सवलत दिली जात आहे. मुंबई, पालघर, ठाणे विभागातून एकूण २,१८६ गाड्यांचे आरक्षण झाले आहे. जादा गाड्यांपैकी १,५४७सामूहिक आणि ५३३ वैयक्तिक गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. तर सध्या १०६ गाड्यांचे आरक्षण सुरू आहे.

दरम्यान, कोकणात जाणाऱ्यांची मोठी संख्या पाहता एसटी स्थानकांमध्ये मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे प्रवाशांनी महामुंबईत बस थांबे द्यावे अशी मागणी प्रवाशांनी केली होती. त्यानुसार, एसटी महामंडळाने स्थानकांतील गर्दी टाळण्यासाठी तात्पुरते ४० बस थांबे निश्चित केले आहेत. तसेच ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही स्वरूपात जादा गाड्या आरक्षणासाठी उपलब्ध करण्यात येत आहेत. यामुळे प्रवाशांना चांगलाच फायदा होत आहे.

### या ठिकाणाहून जादा वाहतूक

**मुंबई सेंट्रल - साईबाबा, काळाचौकी, गिरगाव, कफपरेड, काळबादेवी, महालक्ष्मी ,परळ - सेनापती बापट मार्ग दादर, मांगल्य हॉल (जोगेश्वरी),कुर्ला नेहरूनगर - बर्वेनगर, सर्वोदय, टागोरनगर, घाटला, डी. एन. नगर, गुंदवली, आनंदनगर, शास्त्रीनगर, पार्ले, खेरनगर, वांद्रे, शीव,ठाणे - लोकमान्यनगर, श्रीनगर, विटावा, भाईंदर, नॅन्सी कॉलनी, मालाड, डहाणूकरवाडी / चारकोप, महंतचौक, संकल्प सिद्धी गणेश, भांडुप (पश्चिम आणि पूर्व), मुलुंड,विठ्ठलवाडी - बदलापूर, अंबरनाथ कल्याण-डोंबिवली,नालासोपारा - नालासोपारा आगार,पनवेल पनवेल आगार,उरण उरण आगार,वसई - वसई आगार,अनाळा अनाळा आगार**

**मुंबई, पालघर, ठाणे विभागातून एकूण २,१८६ गाड्यांचे आरक्षण झाले आहे. जादा गाड्यांपैकी १,५४७सामूहिक आणि ५३३ वैयक्तिक गाड्यांचे आरक्षण पूर्ण झाले आहे. तर सध्या १०६ गाड्यांचे आरक्षण सुरू आहे. दरम्यान, कोकणात जाणाऱ्यांची मोठी संख्या पाहता एसटी स्थानकांमध्ये मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे प्रवाशांनी महामुंबईत बस थांबे द्यावे अशी मागणी प्रवाशांनी केली होती.**

# नयन फाउंडेशनच्या सरचिटणीसपदी सी.ए.शंकर अंदानी यांची नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नयन फाउंडेशनने सी.ए. शंकर अंदानी यांची सरचिटणीसपदी नियुक्ती केली आहे. नयन फाउंडेशनच्या सदस्य सचिव आणि संचालक अरुणिमा कुमारी यांनी ही घोषणा केली.

नयन फाउंडेशनच्या कार्यकारी मंडळाच्या वार्षिक बैठकीत, सीए शंकर अंदानी यांची सरचिटणीसपदी एकमताने नियुक्ती करण्यात आली आहे. सीए शंकर अंदानी यांना एनजीओ आणि व्यावसायिक क्षेत्रात काम करण्याचा दीर्घ अनुभव आहे. शंकर अंदानी यांचे नाव देशातील टॉप टेन प्रतिष्ठित सीएमध्ये समाविष्ट आहे. शंकर अंदानी हे एलिट चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष देखील आहेत. याशिवाय, सीता ट्रस्ट त्यांच्या नेतृत्वाखाली बराच काळ काम करत आहे. शंकर अंदानी हे देशातील अनेक मोठ्या संस्थांचे नेतृत्व करण्यासाठी ओळखले जातात. नयन फाउंडेशनचे अध्यक्ष सत्य प्रकाश यांनी सीए शंकर अंदानी यांचे अभिनंदन केले आणि ते म्हणाले की ही संस्था त्यांच्या नेतृत्वात नवीन उंचीवर लक्ष देईल.



नयन फाउंडेशनचे सदस्य सचिव अरुणिमा म्हणाले की, सीए शंकर अंदानी सोसायटीच्या विविध क्षेत्रात मौल्यवान योगदान देत आहेत. विशेषतः स्वयंसेवी संस्थांना मार्गदर्शन करून ज्यांना निधीची आवश्यकता आहे आणि प्रारंभ करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे देखील देत आहेत. अरुणिमा म्हणाले की, शंकर अंदानीच्या नयन फाउंडेशनमध्ये सामील झाल्याने ही संस्था आणखी प्रगती करेल. समाजात मौल्यवान योगदान देईल. सीए शंकर अंदानी यांनी नयन फाउंडेशनमध्ये सरचिटणीस म्हणून नियुक्त केल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि ते म्हणाले की नयन फाउंडेशन सोसायटीच्या खालच्या स्तरावरील लोकांसाठी काम करते. महिलांना स्वतः ची क्षमता बनविण्यासाठी कार्य करते. या संस्थेला पुढे नेण्याचा प्रयत्न केला जाईल, यासाठी जे काही प्रयत्न केले जातील.

# भिवंडी महानगरपालिकातर्फे क्रांतीदिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : आज दिनांक 09.08.2025 रोजी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांचे निर्देशानुसार तसेच हर घर तिरंगा कार्यक्रमांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करुन क्रांतीदिन साजरा करण्यात आला.



महानगरपालिकेचे सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 5 श्री. बाळाराम जाधव आणि सहायक आयुक्त (प्रशासन) श्री. अजित महाडीक यांनी प्रशासनाच्या वतीने हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले आहे.

याप्रसंगी सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 1 श्री. मकसुम शेख, सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 2 श्री. माणीक जाधव, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा श्री. संदिप पटणावर, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. राजेश पवार, कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग श्री. सिद्धीक काझी, उप अभियंता, विद्युत विभाग श्री. ज्ञानेश्वर वाघमारे, परवाना विभाग प्रमुख श्री. स्नेहल पुण्यार्थी, कार्यालीन अधिकारी प्रभाग समिती क्र. 1 श्री. लक्ष्मण कोकणी, क्रिडा व सांस्कृतीक विभाग प्रमुख श्री. मिलींद पळसुले, मुख्य आरोग्य अधिकारी श्री.जयवंत सोनावणे तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

# पोलिस आणि रेल्वे कर्मचाऱ्यांसोबत विद्यार्थिनींचे रक्षाबंधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

जीवनदीप शैक्षणिक संस्था, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथे शुक्रवार, दिनांक. ०८ ऑगस्ट २०२५ रोजी राखी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेतील विद्यार्थिनींनी खर्डी पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना राखी बांधून भावंडांच्या नात्याचे व परस्पर संरक्षणाच्या भावनेचे प्रतीक जपत विद्यार्थिनींनी पोलिसांचे आभार मानले. पोलिस बांधवांनीही



विद्यार्थिनींना सदैव सुरक्षिततेची हमी दिली व समाजाच्या रक्षणासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना, पोलिस दलाविषयी आदर, तसेच समाजातील सुरक्षा यांचे महत्त्व अधोरेखित झाले. तसेच मुंबईची लाईफ लाईन सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या रेल्वे कर्मचारी यांना देखील राखी बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन NSS चे कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सोनावणे आणि प्रा. रसिका सकपाळ यांनी केले.

या उपक्रमात NSS च्या स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. पोलिस, रेल्वे प्रशासन अधिकारी यांच्या सोबत सण साजरा केला.

सदर कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. रविंद्र घोडविंदे सर यांच्या प्रेरणेने आणि महाविद्यालयाचे प्राचार्य. श्री. कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

# बंजारा समाजाचा तिज महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : आपले सांस्कृतिक वैभव, निसर्गा विषयीची एकसंधता व कृतज्ञता, शिवाय प्रणय, श्रृंगार या मानवी नैसर्गिक भावभावनांचे उदात्तीकरण व प्रकटीकरण तसेच लोकरंजन, लोकप्रबोधन व त्यातुन सुसंस्कार या त्रयीनी युक्त असलेल्या तिज (गौरी) महोत्सवास हा भारतीय बंजारा समाज कर्मचारी सेवा संस्था व समस्त गोर बंजारा समाज कल्याण ग्रामीण व टिटवाळा परिसर यांच्या वतीने टिटवाळा गणपती मंदिर धर्मशाळेत मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी बंजारा समाजाची संस्कृती व लोकजीवनाच प्रत्ययकारी दर्शन घडविण्या आले. पारंपारिक तिज महोत्सवाच्या पर्वावर समस्त गोर बंजारा समाज समाज बांधवांनी याच आयोन केलं होत. या मोहत्सवाला भिवंडी लोकसभा खासदार सुरेश म्हात्रे, आमदार विश्वनाथ भोईर तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. यावेळी महिलांनी बंजारा समाजाचे नृत्य सादर केले. तसेच समाजातील विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# 'शोध अभियांत्रिकी मनाचा' समारंभात सेवाभावी अभियंता जीवन पाटील यांचा गौरव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : "शोध अभियांत्रिकी मनाचा" हा गुणगौरव समारंभ मंगलवार पेठेतील सिंचन भवन सर विश्वेश्वरय्या सभागृह पुणे येथे अत्यंत उत्साहात आणि मोठ्या दिमाखात पार पडला. या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी भूषवले.

कार्यक्रमात ग्रंथ प्रकाशन, लेखक अभियंत्यांचा सत्कार, उत्कृष्ट अभियंता पुरस्कार, गुणवंत पाल्यांचा गौरव, प्रबोधनपर व्याख्याने, अभियंता मित्र मासिकाचा ३९ वा वर्धापन दिन, तसेच स्व. मोतीलालजी धूत आणि स्व. प्रभाकर गानू शिष्यवृत्ती प्रदान असे विविध उपक्रम आयोजित



करण्यात आले होते.

या सोहळ्यात, पेण येथील सामाजिक कार्यकर्ते तसे बृहन्मुंबई महानगरपालिका मध्ये उत्कृष्ट अभियंताचे काम केल्याने जीवन शंकर पाटील यांचा सेवाभावी अभियंता म्हणून मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य विकासकर्मी अभियंता डॉक्टर कमलाकांत वडेलकर यांनी विशेष करून जीवन पाटील यांच्या कार्याचा गुणगौरव केला व त्यांनी केलेल्या पाणी खात्यातील योगदानाबद्दल तसेच सन २०१९ मध्ये कोल्हापूर आणि सांगली येथे आलेल्या पूरस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची विशेष नोंद घेण्यात आली.या प्रसंगी मुंबईचा पाणीपुरवठा व जलवाहिनी दुरुस्ती याबाबतची पुस्तिका, डॉ. श्रीपाल सबनीस आणि श्री दिनकर गोजारे (मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका) यांना प्रदान केली.

कार्यक्रमाला समारंभाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस प्रमुख उपस्थिती अँड पुरुषोत्तम खेडेकर, संस्थापक मराठा सेवा संघ दिनकर गोजारे मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका युवराज देशमुख - मुख्य अभियंता(निवृत्त) योगेश भोसले - कनिष्ठ अभियंता, पुणे महानगरपालिका विकास कर्मी "अभियंता मित्र" मासिकाचे संपादक व समारंभ प्रमुख डॉ. कमलकांत वडेलकर ,प्रवीण पाटील विजय मोकल तसेच साहित्य, अभियांत्रिकी आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, अभियंते, विद्यार्थी आदि उपस्थित होते.

# आदिवासी दिनानिमित्त रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये फळवाटप

## सामाजिक कार्यकर्ते भरत कडाळी यांचा पुढाकार



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक आदिवासी दिवस हा आदिवासींच्या हक्कांचे समर्थन आणि संरक्षण करण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांसह एक चांगले जग निर्माण करण्यासाठी आदिवासी समुदायांचे महत्त्वपूर्ण योगदान आणि यश दर्शविते.

जागतिक आदिवासी दिना निमित्त विविध सामाजिक कार्यक्रम व उपक्रम आयोजित करण्यात आले. याच जागतिक आदिवासी दिनानिमित्त टिटवाळा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते भरत कडाळी यांच्यासह जेष्ठ पत्रकार शांताराम तांगडकर, स्फूर्ती फाउंडेशन अध्यक्ष बजरंग तांगडकर, आम्ही नगरकर मुंबई संघ अध्यक्ष मंगेश शेळके, एकनाथ वायळ, शिवाजी भोजने, रमेश वायाळ ( आदिवासी गायक), श्रीकांत भांगरे, भगवान बागडे, लक्ष्मण घाणे, शांताराम बांडे, तुषार पळशीकर, अनिल वायळ, अभिजीत भांगरे, रामकृष्ण गोडे, दिनेश रोंगटे व उत इतर पदाधिकारी फळवाटप साठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमात हॉस्पिटल मधील रूग्णांसोबत , कर्मचारी, सुरक्षारक्षक यांना फळांचे वाटप करण्यात आले.




# अधिक शुल्क आकारल्यास महाविद्यालयांवर कारवाई

## शुल्क नियामक प्राधिकरणाचा महाविद्यालयांना इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : एखाद्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्षात एकापेक्षा अधिक वर्षांचे शुल्क घेऊ नये, असे शुल्क वसूल केल्याची तक्रार आल्यास संबंधित महाविद्यालयावर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा शुल्क नियामक प्राधिकरणाने राज्यातील सर्व वैद्यकीय, उच्च व तंत्र शिक्षण, विधि आणि कृषी अभ्यासक्रमाच्या खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांना दिला आहे. त्यामुळे बेकायदा शुल्क घेणाऱ्या महाविद्यालयांना चाप बसणार आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियमानुसार प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून किती शुल्क घ्यावे, किती वर्षांचे घ्यावे याबाबत सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली, तसेच प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या



विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांनी 2025-26 या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे शुल्क निश्चित केलेले असते. मात्र त्यानंतर अनेक वैद्यकीय, उच्च व तंत्र शिक्षण, विधिव कृषी अभ्यासक्रमाच्या खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांकडून एका वर्षापेक्षा अधिक शुल्क वसूल करण्यात येत असल्याच्या तक्रारी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे येत असतात. त्यामुळे अशा महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. त्यानुसार कोणतीही संस्था एखाद्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करणार नाही आणि एखाद्या शैक्षणिक वर्षात एका वर्षापेक्षा अधिक वसूल केलेले शुल्क हे कॅपीटेशन फी असल्याचे समजले जाईल आणि अशा संस्थेविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्राधिकरणाने दिला आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी फक्त एकाच वर्षाचे शुल्क भरावे. जर संस्थांनी एका वर्षापेक्षा जादा शुल्क घेतले तर त्याबाबतची तक्रार पुराव्यासह प्राधिकरणाच्या fra. govmh@gmail.com या ई-मेलवर करावी, असे आवाहन प्राधिकरणाने विद्यार्थी व पालक यांना केले आहे.

**अनेक वैद्यकीय, उच्च व तंत्र शिक्षण, विधिव कृषी अभ्यासक्रमाच्या खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांकडून एका वर्षापेक्षा अधिक शुल्क वसूल करण्यात येत असल्याच्या तक्रारी शुल्क नियामक प्राधिकरणाकडे येत असतात. त्यामुळे अशा महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे**

# ठाण्यात मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : पोलीस आयुक्त, ठाणे शहर, ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, वेसाक इंडिया, के.जे. सोमय्या महाविद्यालय व माजी विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि.10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पोलीस दवाखाना, ठाणे शहर येथे मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या शिबीरात मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया देखील होणार आहे.

तरी, ठाणे शहरातील सर्व इच्छुक पोलीस अधिकारी-कर्मचारी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी, विद्यार्थी-विद्यार्थीनी व त्यांचे पालक तसेच नागरिकांनी दि.10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 वाजता पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे पोलीस दवाखाना, ठाणे शहर येथे या मोफत नेत्र तपासणी शिबीरामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

# केडीएमसी शाळांतील विद्यार्थ्यांचे पोलीस आणि जवानांना 'आभार पत्र'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: शासनाच्या निर्देशानुसार घरोघरी तिरंगा या अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत, महापालिकेच्या शाळांच्या माध्यमातून अनेक नवीनतम उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याच अनुषंगाने महापालिका परिक्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थ्यांनी, जवानांना "आभार पत्रं" लिहिली आहेत. आपल्या देशातील पोलीस बांधव आणि जवान समाजाला, आपल्या नागरिकांना सुरक्षित ठेवण्यासाठी अहोरात्र डोळ्यात तेल घालून आपले काम करतात. सीमेवरचे जवान तर आपल्या देशासाठी प्रसंगी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन शहीद होतात,हौतात्म्य पत्करतात. अशा आपल्या पोलीस बांधव आणि जवानांच्या आपल्या देशाप्रती, नागरिकांप्रती असलेल्या समर्पणाच्या भावनेसाठी, त्यांच्या शौर्य आणि सेवावृत्तीसाठी महापालिका क्षेत्रातील शाळांमधील शालेय विद्यार्थ्यांनी या पोलिसांना, जवानांना धन्यवाद देत भावनेने ओथंबलेली "आभार पत्रं" लिहून आपल्या राष्ट्रभक्तीची, राष्ट्र प्रेमाची प्रचिती दिली आहे.



# महिलांनी पोलीस व रिक्षा चालक बांधवांना बांधली राखी

## वृक्षारोपण करून पवित्र रक्षाबंधन साजरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : वर्तकनगर परिसरातील सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील महिला भगिनीं एकत्र येऊन कर्तव्यरूपाने रक्षण करणाऱ्या पोलीस बांधव आणि रिक्षा वाहतूक करणाऱ्या बांधवाना ऋण भावनेने शिवसेना उपविभागप्रमुख तथा पोलीस मित्र संघटना ठाणे जिल्हा अध्यक्ष गणेश संपत तांबे आणि सहकारी यांचे वतीने वर्तकनगर पोलीस ठाणे आणि यशोधन नगर रिक्षा थांबा येथे पोलीस व रिक्षा चालक यांना सालाबादप्रमाणे दिनांक 09 ऑगस्ट 2025 रोजी राखी बांधून तसेच वृक्षारोपण करून पवित्र रक्षाबंधन उपक्रम उत्साहात पार पडला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आशीर्वादाने व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत महिला सुरक्षिततेचे प्रबोधन, समाजात

**अशा उपक्रमांचे नियोजन करून शिवसेना पक्ष आणि पोलीस मित्र संघटनेचा वतीने पुढाकार घेऊन बांधिलकी जपली जात आहे. असे यावेळी बोलताना गणेश संपत तांबे यांनी सांगितले.**

एकोपा जपणे, एकमेकांना सहकार्य करीत समाज घडवण्याचे मार्गदर्शन व नियोजन करणे. त्यांच्यासाठी आशा उपक्रमांचे नियोजन करून शिवसेना पक्ष आणि पोलीस मित्र संघटनेचा वतीने पुढाकार घेऊन बांधिलकी जपली जात आहे. असे यावेळी बोलताना गणेश संपत तांबे यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी विद्या शिंदे, लक्ष्मी चांदणे, नताशा सोनकर, रूपाली जाधव, सुजाता रोकडे, सुवर्णा अहिरराव, निशा फुलसुंदर, विभावरी तांबे, कल्याणी भांगरे, मदन मैती, अनिल राठोड, आत्माराम जाधव आणि सहकारी उपस्थित होते.

## स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या स्पर्धेत

# भिवंडी महानगरपालिकेस ओडीएफ ++ मानांकन प्राप्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ स्पर्धेत एक मानाची बाब म्हणजे भिवंडी मनपास ओडीएफ ++ मानांकन प्राप्त झाले आहे. भिवंडी महापालिका आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकाने ३-१० लाख लोकसंख्या गटात राष्ट्रीय स्तरावर ६७ वा क्रमांक प्राप्त केला आहे. गतवर्षीच्या स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या १४३ व्या क्रमांकावरून या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मधील ६७ वा क्रमांक प्राप्त झाल्याने मनपा प्रशासनात आनंदाचे वातावरण आहे.



स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या स्पर्धेतील मिळालेले हे दुहेरी यशाबद्दल भिवंडी आयुक्त यांनी मनपा अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले असून, सदर यशात मोलाचा वाटा असणारे भिवंडीचे नागरीक यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण व शासनाच्या विविध उपक्रमात सातत्याने चांगले मानांकन प्राप्त होण्यासाठी भिवंडीच्या नागरिकांनी संपूर्ण शहरांमध्ये स्वच्छ राखून, महापालिका प्रशासनास सहकार्य करावे असेही आवाहन मनपा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से.) यांचेकडून करण्यात आले आहे.

# मुरबाड तालुक्यातील सहा हजार लाडक्या बहिणी अपात्र

## महिलांमध्ये संतापाची लाट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : राज्य सरकारच्या "लाडकी बहिण" योजनेअंतर्गत आर्थिक लाभाची अपेक्षा बाळगणाऱ्या मुरबाड तालुक्यातील तब्बल सहा हजार महिलांना अपात्र ठरवण्यात आले आहे. ही धक्कादायक आकडेवारी समोर आल्यानंतर महिलांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, मुरबाड तालुक्यातील विविध गावांमधून सुमारे 26 हजार महिलांनी या योजनेसाठी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी जवळपास 6 हजार अर्ज विविध कारणास्तव फेटाळण्यात आले आहेत. अपात्रतेची प्रमुख कारणे म्हणजे दस्तऐवजांतील त्रुटी, उत्पन्न मर्यादा ओलांडणे, आधार व बँक खात्याची लिंकिंग समस्या, तसेच चुकीची माहिती सादर करणे.



अनेक लाभार्थी महिलांचे म्हणणे आहे की, स्थानिक प्रशासनाने अर्ज तपासणी प्रक्रियेत पुरेशी पारदर्शकता ठेवली नाही. अनेक ठिकाणी पात्र महिलांनाही कोणतीही स्पष्ट कारणे न देता अपात्र करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही ठिकाणी अर्जदारांना दुरुस्ती करण्याची संधी न देता थेट फेटाळणी करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

या प्रकरणी महिलांनी ग्रामपंचायत, तालुका प्रशासन तसेच आदिवासी विकास विभागाकडे लेखी तक्रारी दाखल करण्यास सुरुवात केली आहे. लवकरच मोठ्या प्रमाणावर मोर्चा व आंदोलने करण्याचा इशारा स्थानिक महिला गटांनी दिला आहे.

दरम्यान, तालुका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सर्व अपात्र अर्जाचा पुनर्विचार करण्यात येईल आणि खरी पात्रता असलेल्या महिलांना न्याय मिळेल. मात्र तोपर्यंत हजारो लाडक्या बहिणींची प्रतीक्षा आणि संताप वाढतच चालला आहे.




नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# बारवी धरण ९६ टक्के भरले : पावसाचा जोर ओसरल्याने अद्याप ओव्हरफ्लो नाही

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथः बारवी धरण परिसरात या वर्षी पावसाची सुरुवात मे महिन्यातच झाली होती. पश्चिम विक्षोभामुळे मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यातच हलका पाऊस पडला. त्यानंतर मे अखेरीस अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने धरण परिसरातील पाणलोट क्षेत्राला लवकरच ओलावा मिळाला. जून महिन्यात मोसमी पावसाची दमदार सुरुवात झाली आणि जुलै महिन्याच्या पहिल्या तीन आठवड्यांपर्यंत पावसाने चांगलीच जोरदार हजेरी लावली. त्यामुळे यंदा मे महिन्यात बाष्पीभवन होण्याचे प्रमाण जवळपास नगण्य राहिले आणि धरण लवकर भरून वाहण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र शेवटच्या टप्प्यात जुलै महिन्याच्या अखेरपासून पाऊस मंदावला. परिणामी ९ ऑगस्ट उजाडला तरी बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहिले नाही.

मे महिन्यात कोसळणाऱ्या पावसाने जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाने अचानक पाठ फिरवली. पावसाची ही साथ कमी झाल्यामुळे ऑगस्टच्या सुरुवातीपर्यंत धरण पूर्ण क्षमतेने भरलेले नाही. शनिवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी



७ वाजेपर्यंतच्या नोंदीनुसार, बारवी धरणाची पातळी ७२.२४ मीटरवर पोहोचली आहे. धरणाची ओव्हरफ्लो पातळी ७२.६० मीटर असून सध्या धरणात ३२६.११ दशलक्ष घनमीटर (एमसीएम) पाणीसाठा आहे, जो एकूण क्षमतेच्या ९६.२४ टक्के आहे. गेल्या २४ तासांत धरण परिसरात १२ मिमी पाऊस झाला असून, यंदा आतापर्यंत एकूण १९७७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी याच दिवशी, ९ ऑगस्ट २०२४ धरण ७२.६३ मीटर पातळीवर होते. तेव्हा पाणीसाठा ३३९.३८ एमसीएम म्हणजेच १००.१६ टक्के होता. तसेच त्या वर्षी आतापर्यंत २०७९ मिमी पावसाची नोंद झाली होती. यावरून यंदाच्या पावसात आणि पाणीसाठ्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत किंचित घट असल्याचे दिसून येते. गेल्या वर्षी आजच्याच दिवशी धरण भरू वाहू लागले होते.

शनिवारी मात्र पावसाच्या तुरळक सरी कोसळत होत्या. त्यामुळे धरण भरण्याची प्रतिक्षाच आहे. जुलै अखेरपर्यंत पाऊस जोरात असल्याने अनेकांनी धरण लवकर भरून वाहण्याची अपेक्षा केली होती. परंतु गेल्या दोन आठवड्यांपासून झालेल्या पावसाच्या कमतरतेमुळे ती शक्यता अद्याप पूर्ण झालेली नाही. पाणीसाठा समाधानकारक असला तरी, पावसाची ही अनिश्चितता लक्षात घेता पुढील काही दिवसांत पावसाची पुनरागमन होणे आवश्यक आहे. अन्यथा धरण ओव्हरफ्लो होण्याचा क्षण यंदा गेल्या वर्षापेक्षा उशिरा येण्याची शक्यता आहे.

पाणीपुरवठा आणि सिंचनासाठी बारवी धरण महत्त्वाचे असल्याने त्यातील पाणीसाठ्यावर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष केंद्रित आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ऑगस्टच्या मध्यावर पावसाची तीव्रता पुन्हा वाढण्याची शक्यता असून, त्यानंतर धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीत, धरण ९६ टक्के भरले असले तरी गेल्या वर्षासारखे लवकर ओव्हरफ्लो होण्याचे चित्र नाही.






## हजारो भगिनींनी बांधली भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांना राखी

कल्याण-डोंबिवलीतील समस्त बहिणींशी असणारा ऋणानुबंध वाढविणारा रक्षाबंधनाचा सण दरवर्षी प्रमाणे डोंबिवली पश्चिम येथील जनसंपर्क कार्यालयात रक्षाबंधनाचा कौटुंबिक सोहळा संपन्न झाला.










*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*